**अ.** परिपत्रक क्र. १४४ व त्यानंतर वेळोवेळी दिलेल्या सूचना, आदेश व पारीत केलेली परिपत्रके या आधारे बृहन्मुंबई महानगरपालीका विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील नियम ३३(१०) अंतर्गत प्राप्त होणा-या झोपडपट्टी पुनर्वसन योजनांचे प्रस्तावावर **सर्व विभाग प्रमुखांचे स्वयंस्पष्ट होकारार्थी/नकारार्थी अभिप्राय** संबंधित विभागाच्या कार्यकारी अभियंता, अभियांत्रिकी विभाग, झो.पु.प्रा. यांचेकडे प्राप्त झाल्यानंतरच प्राप्त प्रस्तावाची छाननी करून प्रस्ताव स्विकारणेबाबत उपमुख्य कार्यकारी अभियंता यांचेकडे टिपणी सादर करतील. **प्रस्ताव स्विकारणे/नाकारणे** याबाबत **संबधित उपमुख्य कार्यकारी अभियंता आवश्यक कार्यवाही करतील.**

**ब.** जर एखाद्याही विभाग प्रमुखांचे अभिप्रायामध्ये प्रस्ताव स्विकृतीसाठी विहीत केलेल्या कागदपत्र/ कार्यपद्धती या अनुषंगाने त्रुटी असल्यामुळे प्रस्ताव स्विकृतीसाठी योग्यायोग्य ठरविणेकामी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्णय घेणे गरजेचे असेल (for using discretionary power), अशी प्रकरणे छाननी करून प्रस्ताव स्विकारणेबाबत उपमुख्य कार्यकारी अभियंता व सचिवामार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे निर्णयास्तव सादर करण्यात यावीत.

**क.** तसेच दिनांक ०२.०२.२०१५ च्या आदेशात नमूद केल्याप्रमाणे दाखल होणा-या झोपडपट्टी पुनर्वसन योजनांच्या हद्दी या खूप वेड्यावाकड्या असल्याने पुनर्वसन व विक्री घटकाच्या इमारतींचे बांधकाम नियोजनासाठी ब-याच अडचणी येत असल्यास व वेगवेगळी आरक्षणे विचारात घेऊन झोपडपट्टी क्षेत्राचे योग्य नियोजन करणे शक्य व्हावे यास्तव बृहन्मुंबई महानगरपालीका विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील नियम ३३(१०) चे परिशिष्ट IV च्या उपनियम (Clause) ३.१६ मधील तरतुदींचा वापर करणे आवश्यक असेल, तर अशी प्रकरणे स्विकृतीचा निर्णय घेणेस्तव मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर करण्यात यावीत.

**ड.** परिपत्रक क्रमांक १६८, दिनांक ३१.१२.२०१५ नुसार Principal Acceptance Letter मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेनेच देण्यात येईल.

**इ.** बृहन्मुंबई महानगरपालीका विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील नियम **३३(१४)ड** व **३.११** अंतर्गत प्राप्त होणा-या झोपडपट्टी पुनर्वसन योजनांचे प्रस्ताव स्विकृतीबाबत निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावरून घेण्यात येईल.

सदर आदेशाची अंमलबजावणी तत्काळ करण्याची आहे.

(दीपक कपूर)
मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई.

प्रत:-
सर्व विभाग प्रमुख, झो.पु.प्रा.